प्रेस प्रकाशनी PRESS RELEASE

भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA

वेबसाइट : www.rbi.org.in/hindi
Website : www.rbi.org.in
ई-मेल/email : helpdoc@rbi.org.in

**संचार विभाग,** केंद्रीय कार्यालय, शहीद भगत सिंह मार्ग, फोर्ट, मुंबई - 400 001

**Department of Communication**, Central Office, Shahid Bhagat Singh Marg, Fort, Mumbai - 400 001 फोन/Phone: 022 - 2266 0502

05 जानेवारी 2026

**भारतीय रिजर्व बँकेने शहा फिनलीज प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई वर आर्थिक दंड ठोठावला**

भारतीय रिजर्व बँकेने 02 जानेवारी 2026 रोजीच्या आदेशाद्वारे शहा फिनलीज प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई (कंपनी) वर भारतीय रिजर्व बँकेने 'फेअर प्रॅक्टिसेस कोड' वर दिलेल्या काही निर्देशांचे पालन न केल्याबद्दल ₹10,000/- (केवळ दहा हजार रुपये) चा आर्थिक दंड ठोठावला आहे. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया कायदा, 1934 च्या कलम 58B(5)(aa) सह वाचलेले कलम 58G(1)(b) अंतर्गत आरबीआयला मिळालेल्या अधिकारांचा वापर करून हा दंड ठोठावण्यात आला आहे.

भारतीय रिजर्व बँकेद्वारे कंपनीची प्रत्यक्ष तपासणी करण्यात आली होती. आरबीआयच्या निर्देशांचे पालन न केल्याचे पर्यवेक्षी निष्कर्ष आणि त्या संदर्भात संबंधित पत्रव्यवहार यांवर आधारित, कंपनीला नोटीस बजावण्यात आली होती, ज्यामध्ये म्हटल्याप्रमाणे, 'फेअर प्रॅक्टिसेस कोड' वरील आरबीआयच्या निर्देशांचे पालन करण्यात अयशस्वी झाल्याबद्दल कंपनीला दंड का लावला जाऊ नये याची कारणे दाखवा अशी विचारणा करण्यात आली होती. कंपनीने नोटिशीला दिलेले उत्तर, अतिरिक्त सबमिशन आणि वैयक्तिक सुनावणी दरम्यान केलेले तोंडी सादरीकरण यांचा विचार केल्यानंतर, भारतीय रिजर्व बँकेला, आढळले की, कंपनीविरुद्ध पुढील आरोप कायम आहे, ज्यामुळे कंपनीवर आर्थिक दंड आकारला जाणे आवश्यक आहे.

कंपनी 'फेअर प्रॅक्टिसेस कोड'च्या अनुपालनाची नियतकालिक समीक्षा करण्याची व्यवस्था स्थापित करण्यात अपयशी ठरली.

ही कृती नियामक अनुपालनातील कमतरतांवर आधारित आहे आणि यामधे कंपनीने तिच्या ग्राहकांसोबत केलेल्या कोणत्याही व्यवहाराच्या किंवा कराराच्या वैधतेवर प्रश्न चिन्ह उपस्थित करण्याचा हेतू नाही. याशिवाय, हा आर्थिक दंड लादणे हे कंपनीच्या विरोधात आरबीआयने सुरू केलेल्या इतर कोणत्याही कारवाईचा पूर्वग्रह न ठेवता आहे.

**(ब्रिज राज)**

**मुख्य महाप्रबंधक**

**Press Release: 2025-2026/1853**